-: प्रेसनोट दिनांक- ११/०२/२०२० :-

**आयुबखान दस्तगीर देसाई, वय ५४, मंडळ अधिकारी - भाग जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर, वर्ग-३, रा. श्री. डी.व्ही.चव्हाण यांचे घरी भाडयाने, कोळी गल्ली, एस टी स्टॅण्डजवळ, शिरोळ, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर, मुळ रा. घाटगे गल्ली, पुलाची शिरोळ, ता. हातकणंगले जि. कोल्हापूर यांनी लाच मागणी करून लाच स्विकारलेबाबत व खाजगी कॉम्प्युटर ऑपरेटर अमोल प्रशांत कोळी, वय ३२,, रा. धनगरवाडा, आगार रोड, शिरोळ, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर यांने देसाई यांनी स्विकारलेली लाच रक्कम लपविण्यास मदत केलेबाबत.........**

---

यातील तक्रारदार श्री.रोहीत भुपाल मगदूम, वय-३०, व्यवसाय-शेती, रा. मु.पो.उमळवाड, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर यांची उमळवाड ता. शिरोळ, जि.कोल्हापूर येथे गट नंबर- ४५३/३ मध्ये माझे वडीलांचे नांवे २८.७५ आर इतकी वडीलोपार्जित शेतजमीन आहे. त्यांचे ओळखीतील किरणकुमार धनपाल कुंभार, रा.अंकली, जि.सांगली यांची अंकली येथे विटभट्टी आहे. त्या विटभट्टी करीता तक्रारदार हे कुंभार यांना त्यांचे शेतजमिनीमधून ५०० ब्रास माती देणार आहेत. त्याकरीता शासनाची परवानी आवश्यक असते. त्यामुळे किरणकुमार कुंभार यांच्या नांवाने तहसीलदार, तहसील कार्यालय, शिरोळ यांचेकडे तक्रारदार यांचे शेतजमीनीमधून ५०० ब्रास माती उत्खनन करणेची परवानगी मिळणेकरीता तक्रारदार यांनी कुंभार यांचेमार्फत सविस्तर अर्ज दिला आहे. त्यांनी दिलेल्या अर्जाप्रमाणे संबंधीत सर्कल अधिकारी हे प्रत्यक्ष माती उत्खननच्या ठिकाणी येवून सविस्तर पंचनामा करतात आणि माती उत्खनन करणेसाठी परवानगी मिळणेकरीता सविस्तर अहवाल तहसिलदार यांना सादर करीत असतात. त्यामुळे तक्रारदार यांनी दिलेला अर्ज हा तहसिलदार कार्यालय शिरोळ यांनी संबंधीत सर्कल देसाई यांचेकडे पाठविणेत आला होता. त्या अर्जाप्रमाणे सर्कल आयुबखान देसाई यांनी आवश्यक ती कागदपत्रे मागणीसाठी किरणकुमार कुंभार यांना दिनांक १०/०१/२०२० रोजी नोटीस काढुन त्या नोटीसप्रमाणे उमळवाड तलाठी कार्यालयात हजर राहणेस सांगितले. ज्या शेतजमीनीमधून माती उत्खनन करणार आहेत, त्या शेत जमिनीचे मुळ मालक तक्रारदार यांचे वडील असल्याने त्यांचा मुलगा या नात्याने तक्रारदार यांनी त्यांचे ज्या शेती जमिनीमधून माती उत्खनन करणार त्याची सर्व कागदपत्रे घेवून दिनांक २३/०१/२०२० रोजी संबंधीत सर्कल देसाई यांचेकडे जमा केली.

त्यांनतर दिनांक ०६/०२/२०२० रोजी तक्रारदार व सर्कल देसाई यांची भेट झालेवर तक्रारदार यांनी त्यांना त्यांचे शेतजमीनीमधील ५०० ब्रास माती उत्खननासाठी किरण कुंभार यांच्या नांवाने दिलेल्या अर्जाप्रमाणे माती उत्खनन करणेची परवानगी (रॉयल्टी) निघाली काय? म्हणून विचारले. त्यावेळी सर्कल देसाई यांनी तक्रारदार यांना शासकीय परवानगीसाठी (रॉयल्टीसाठी ) शासकीय फी ८०,०००/- रूपये भरावे लागणार आणि त्यांना त्याच्या डब्बल म्हणजे १,६०,०००/- रूपये द्यावे लागतील. तरच ते तक्रारदार यांचे शेतजमिनीमधून ५०० ब्रास माती उत्खनन करणेसाठी शासनाची परवानगी मिळणेबाबतचा पूरक असा प्रस्ताव/अहवाल कागदपत्रासह तहसिलदार शिरोळ यांना पाठविणार, नाहीतर पूरक असा अहवाल पाठविणार नाही असे सांगितलेने तक्रारदार यांनी कुंभार यांचेशी चर्चा करून सर्कल आयुबखान देसाई यांचेविरूध्द तक्रारी अर्ज दिला होता.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे दिनांक ११/०२/२०२० रोजी सर्कल कार्यालय, जयसिंगपूर येथे शासकीय पंच साक्षीदारांचे समक्ष सर्कल देसाई यांचे लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, पडताळणीमध्ये सर्कल देसाई यांनी तक्रारदार यांना त्यांचे वडीलोपार्जित शेतजमीनी मधून वीटभट्टीसाठी आवश्यक ५०० ब्रास माती उत्खनन करणेकरीता पूरक असा प्रस्ताव कादपत्रासोबत तहसिलदार कार्यालय शिरोळ येथे पाठविणेसाठी १,६०,०००/- रू. लाचेची मागणी करून ती लाच रक्कम लागलीच घेवुन येण्यास सांगितलेचे निष्पन्न झाले.

त्यानुसार जुने महसुल भवन, शिरोळ येथे सापळा कारवाई आयोजित केली असता, तक्रारदार यांना त्यांचे वडीलोपार्जित शेतजमीनी मधून वीटभट्टीसाठी आवश्यक ५०० ब्रास माती उत्खनन करणेकरीता पूरक असा प्रस्ताव कादपत्रासोबत तहसिलदार कार्यालय शिरोळ येथे पाठविणेसाठी सर्कल आयुबखान देसाई यांनी तक्रारदार यांचेकडुन १,६०,०००/- रू. लाच रक्कम स्विकारली व ती लाच रक्कम लपवुन ठेवणेसाठी आरोपी खाजगी कॉम्प्युटर ऑपरेटर अमोल कोळी यांनी आरोपी नं. १ देसाई यांना मदत केल्याने त्यांना रंगेहात पकडणेत आले आहे. सदरबाबत तक्रारदार/फिर्यादी श्री.रोहीत भुपाल मगदूम, वय-३०, व्यवसाय-शेती, रा. मु.पो.उमळवाड, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर फिर्यादीवरून आरोपी लोकसेवक आयुबखान दस्तगीर देसाई, वय ५४, मंडळ अधिकारी - भाग जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर, वर्ग-३, रा. श्री. डी. व्ही.चव्हाण यांचे घरी भाडयाने, कोळी गल्ली, एस टी स्टॅण्डजवळ, शिरोळ, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर, मुळ रा. घाटगे गल्ली, पुलाची शिरोळ, ता. हातकणंगले जि. कोल्हापूर व खाजगी कॉम्प्युटर ऑपरेटर अमोल प्रशांत कोळी, वय ३२, रा. धनगरवाडा, आगार रोड, शिरोळ, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर यांचेविरूध्द शिरोळ पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्रीमती सुषमा चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व मा. श्री. आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांचे मार्गदर्शनानुसार श्री.जितेंद्र पाटील पोलीस निरीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, सफौ. शामसुंदर बुचडे, पोना नवनाथ कदम, पोकॉ मयुर देसाई व संग्राम पाटील, चालक पोहेकॉ सुरज अपराध, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**

**२)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**

**३)श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३, कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**

**४)हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४,**

**५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**